काल पार्टीहून परत येताना ह्यांनी अशी फर्माईश केली आणि मी अजिबात नर्व्हस न होता, "हो करते की, तुम्हाला फक्कड जेवण करून देते" असं उत्तरले. कारण नवरोजींचं असलं भाषण मला आता पाठ झालंय. म्हणून जरी पार्टीला जेवायला जायचं असलं तरी घरी जेवण्याची तयारी करूनच मी ह्यांच्याबरोबर पार्टीला जाते. हो, कारण मी पार्टीत पोटभर जेवूनआनंदात परत घरी आल्यावर उशीरा रात्री ह्यांच्यासाठी परत स्वयंपाक करणं खरंच जीवावर येतं. पण असा प्रसंग नेहमीचाच असतो. मी बघून ठेवलंय, ह्यांचं हे नेहमीचंच असतं.

साडी खरेदीला किंवा कुठल्याही खरेदीला यांना अजिबात बरोबर न्यायचं नाही, हे मी अनुभवानं शिकलेय. लग्न झाल्यावर सुरूवातीला हे एकदा माझ्याबरोबर साडी खरेदीला आले होते. आता तुम्हाला माहिती आहेच की साडी घेताना रंग, पोत, डिझाईन, काठ, पदर, किंमत, फॅशन अशा किती गोष्टींची सांगड घालावी लागते. सगळ्या गुणांची पत्रिका जमली की मगच साडी खरेदी होते. पण त्यासाठी किती कष्ट पडतात, किती दुकानं हिंडावी लागतात, किती पेशन्स ठेवावा लागतो ! पण तेव्हा ह्यांना मात्र अनुभव नव्हता ना ! त्यामुळं त्यांना साडी-पत्रिका जमणं जरा कठीणच वाटत होतं. खूप कंटाळून गेले. बहुधा ह्यांना त्या सेल्समनची कीव आली आणि त्या बिचाऱ्याला त्रासातून सोडवण्यासाठी हे "हीच साडी घे लवकर, आटप जरा", असा मलाच फोर्स करायला लागते. शेवटी मला न आवडलेल्या साडीची खरेदी करून आम्ही घरी आलो.

असं बरेचदा व्हायला लागलं. "मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे. माझ्यापेक्षा तुम्हांला त्या सेल्समनची दया येते आणि मग माझ्या गळ्यात कुठली तरीच साडी पडते." असं मी मनातच म्हणू लागले. नवीन लग्न झालं होतं ना, काय बिशाद होती माझी असं म्हणायची ? पण जेव्हा घरातल्या वॉर्डरोबमध्ये बऱ्याच साड्या मला न आवडणाऱ्या झाल्या, तेव्हा मात्र मी ठरवलं, आता मला आवडतील त्याच साड्या घ्यायच्या, म्हणजे वेगळ्या शब्दात सांगायचं तर ह्यांना साडी खरेदीला न्यायचं नाही. एके दिवशी धीर करून घाबरत मी ह्यांना म्हटलं, "मला साडी घ्यायची आहे पाडव्याची, मी मैत्रीणीबरोबर जाऊ का ?" तेव्हा चक्क अत्यानंदानं ह्यांनी मला टाळीच दिली आणि म्हणाले, "वा ! वा ! फारच बरं होईल ! थँक्स हं, मला ह्या खरेदीतून वाचवलंस म्हणून. आता तुला कधीही वाटेल तेव्हा मैत्रिणी बरोबरच जात जा." चला तेही सुटले आणि मीही सुटले.

मी एखाद्या गोष्टीची अगदी वाट पहात राहायची, आणि ह्यांनी मात्र ती गोष्ट पूर्णपणे विसरायची. हा तर परिपाठच ठरून गेलाय. ह्यांचं हे नेहमीचंच आहे. मागच्या आठवड्यातली गोष्ट. मस्त पिक्चर लागला होता सिटीप्राईडला. ह्यांना विचारलं, म्हटलं, "शनिवारी जाऊ या का ? बाराला आहे." "होऽऽ" ह्यांच्याकडून तोंड भरून होकार आला. मी उत्साहानं आधी जाऊन तिकिटं काढून आणली. म्हटलं आयत्या वेळी 'हाऊसफुल्ल' म्हणून परत यायला नको. हे महाराज शनिवारी सकाळी साडेआठला मित्रांना भेटायला म्हणून 'वैशाली'वर गेले. मी ही स्वयंपाकाच्या गडबडीत होते त्यामुळं आठवण करायला विसरले. कुठचं काय ! साडेअकरा झाले तरी ह्यांचा पत्ता नाही. मोबाईलही घरी विसरलेला, निरोप तरी कसा देणार ? मी तर केव्हाची आवरून बसले होते. बरं हे एवढा उशीर करतील असंही वाटलं नाही. शेवटी स्वारी एक वाजता परत आली. आल्या आल्या, "अगं सगळेजण बरेच दिवसांनी जमलो होतो. मस्त ब्रेकफास्ट झाला होता, म्हणून बसलो गप्पा मारत" असं सांगून मोकळे. सिनेमाचं ह्यांच्या अजिबात डोक्यात नव्हतं वाटतं. घरी आल्यावर माझ्या चिडक्या चेहऱ्याकडे आणि बाहेर जायच्या तयारीकडे बघून ह्यांच्या डोक्यात एकदम ट्यूब पेटली आणि हे एकदम दचकले. "अरे बापरे, सॉरी हं, सॉरी ! जाम लक्षात नाही बघ. चल आत्ता जायचं का?" "काही गरज नाही. मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे. माझी बिलकुल कदर नाही तुम्हांला. मी कोण ? कोण आहे तुमची? मित्रांपुढे माझी काय किंमत......" पुढचं सगळं डोळ्यातून टपटपणाऱ्या पाण्यात वाहून गेलं. ह्यांना मात्र फार म्हणजे फार फील झालं. हेही नेहमीचंच ! संध्याकाळी आम्ही त्याच पिक्चरला गेलो तेव्हा कुठं मी ठिकाणावर आले.

वाढदिवस, लग्नमुंजीला जायचं विसरणं, माझ्याबरोबर सिनेमाला जाणं, बागेत जाणं वगैरे चिल्लर गोष्टी तर हमखास विसरणं म्हणजे नवीन काही नाही. हे तर नेहमीचंच आहे. त्यामुळं महत्त्वाच्या गोष्टी मलाच लक्षात ठेवायला लागतात. असो. असे प्रसंग तुमच्याही घरी येतात का हो ?

मला अजिबात न विचारता धाडकन ३-४ मित्रांना घरी घेऊन यायचं आणि "अरे जेवूनच जा ना, काय घाई आहे ?", असा अती प्रेमळ आग्रह करायचा, ही तर ह्यांची खासियत. घरात तेवढी भाजी

वगैरे आहे की नाही, हिला आयत्या वेळी गोडधोड करायला जमेल की नाही, वगैरे काहीही डोक्यात न घेता आमंत्रण देणं म्हणजे तर ह्यांची नेहमीचीच गोष्ट आहे. आता लग्नाला इतकी वर्ष झाल्यामुळे त्यात नवीन काही वाटत नाही. अशा आयत्या वेळच्या परीक्षेतही मी उत्तम रीत्या पास होतेय. अवघड अभ्यासही सरावानं जमायला लागतो ना, तसंच.

लग्नानंतर दोन-तीन वर्षातली गोष्ट. घरातला सोफासेट खूप जुना वाटत होता. छान, लेटेस्ट स्टाईलचा सोफासेट विकत आणू या, असं आम्ही ठरवलं होतं. पैशाची जमवाजमव केली होती. आता सणाच्या मुहूर्तावर पैसे द्यायचे आणि त्याच दिवशी सोफासेट घरी आणायचा या आनंदात होतो. एवढ्यात ह्यांना निरोप आला की मित्रांच्या वडिलांना दवाखान्यात ॲडमिट केलंय. मित्र नेमका गावाला गेलाय आणि वहिनी एकट्याच आहे. पैशाची गरज आहे. तेव्हा ह्यांनी ताबडतोब सोफासेटसाठी बाजूला काढून ठेवलेले पैसे वहिनींकडे नेऊन दिले, त्यांची वेळ भागवली. पुढे थोड्यात दिवसांनी सोफासेट घरी आला. स्वत:ची गैरसोय झाली तरी वेळेला दुसऱ्याला मदत करणं ही देखील यांची नेहमीचीच गोष्ट आहे. असे मदतीला धावून जाण्याचे प्रसंग आत्तापर्यंत बरेच आलेत. पण मला मात्र ह्यांच्या अशा वागण्याचा फार फार अभिमान आहे.

कधीकधी बारीक सारीक गोष्टीत, नॉर्मल नवरा-बायको सारखं त्यांचं आणि माझं अजिबात पटत नाही. अशा वेळी मी खूप वेळा चिडते, रागावते, अबोला धरते. ''मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे'' अशी तक्रार करते. पण ह्यांना मात्र माझा राग काढायच्या युक्त्या माहिती आहेत. सगळ्याच नवऱ्यांना त्या माहिती असतात. म्हणूनच ना संसाररूपी रथाची दोन चाकं म्हणजे नवराबायको दोघं मिळून हा रथ पुढं पुढं चालवतात, ढकलतात, पळवतात वगैरे वगैरे. मधून मधून त्यांच्या रथाच्या चाकातली हवा चेक करायला लागते. पण काय, वाहन म्हटल्यावर मेंटेनन्स आलाच. आपण नाही का चाक पंक्चर झालं, तर न चिडता पंक्चर काढून टाकतो, हवा भरतो, पुन्हा वाहन चालू करतो, तसंच.

परवा असंच झालं. या आठवड्यात दुसऱ्यांदा (आणि या महिन्यात चौथ्यांदा) माझ्या हातून काचेचा ग्लास, कसा कोण जाणे, पडला आणि फुटला. त्याच्या काचा गोळा करताना नकळत एक काच कचकन् पायात घुसली. मी चांगलीच कळवळले आणि डोळ्यातून पाण्याच्या धारा सुरू झाल्या. हे धावत स्वयंपाकघरात आले. समोरचं दृश्य पाहून माझ्याच स्टाईलमध्ये म्हणाले, ''मी बघून ठेवलंय. तुझं हे नेहमीचंच आहे. ग्लास फुटल्याचं काही नाही, पण तुला लागलं नाही ना ? अरेच्या, काच घुसली वाटतं पायात. थांब, चालू नकोस. बस तिथेच खाली. मी काढतो, ''ह्यांनी पायातली काच काढली. कापसानं रक्त पुसलं, डेटॉल लावलं, नंतर जमिनीवरच्या काचा गोळा केल्या, वगैरे वगैरे.

पण मी मात्र अंतर्मुख झाले. ''मी बघून ठेवलंय. तुझं हे नेहमीचंच आहे.'' हे माझं वाक्य जणू माझ्यावर बूमरँगच झालं होतं. मी जसं ह्यांना म्हणते तसं हे ही मला म्हणू शकतात. माझंही चुकत असेल, मी सुद्धा खूप वेळा माझ्या नकळत यांना त्रास होईल असं वागत असेन. ह्यांनाही माझं वागणं कधीकधी आवडत नसेल, याचा मी विचारच केला नव्हता. हे कधी लक्षातच आलं नव्हतं. मला अगदी शरमल्यासारखं झालं.

म्हणूनच परवापासून मी ठरवलंय. ''तुमचं हे नेहमीचंच असतं'' असं म्हणून चिडायचं नाही. ह्यांना दुखवायचं नाही.

पण स्वभावाला औषध नाही. यांच्याही, आणि माझ्याही. (खरं सांगायचं तर औषधही आहे, पण ते लागू पडत नाही) तेव्हा बघू या, कितपत जमतंय ते.

**सौ.अरूणा मदन नगरकर**, कर्वेनगर, पुणे.

---

# AAJ KA NETA

A Gandhian only on October 2nd each year,
Apprehensive even of his party yaars,
Jaunting offshores on flimsy grounds with
family and friends in tow
Kinglet of his consttiuency with expatriates
and goons as his chamchas,
Abetting corruption, Amassing wealth,
Notoriety, not Gandhigiri being
religiously followed.
Extravagant in spending tax-payers
hard earned money,
Terrorising Corporates and Business houses,
Alack it's for my party the moans.

**- M. E. Benjamin**, Borivali (West)

---

## ''कोल्हापूर युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेहमेळावा''

*बुधवार दि. ५ सप्टेंबर २००७ रोजी दुपारी ३ ।। वाजता खरे मंगल कार्यालय, विद्यापीठ रोड, कोल्हापूर येथे* आयोजित केला आहे. त्यासंबंधी सर्व सदस्यांना वैयक्तिक निमंत्रण पाठविले आहेत. तथापि ते मिळाले नसल्यास हेच निमंत्रण समजून सर्वांनी हजर रहावे.

**- सेक्रेटरी, कोल्हापूर युनिट**

# 'संवाद' लेख स्पर्धा २००७
## पुरुष विभाग-तृतीय पारितोषिक विजेता लेख
## "तुम्हा बायकांचे हे नेहमी असंच असतं"

" अगं आटप लवकर. दहा वाजून गेले."उगाच गडबड करू नका हो ! मला माहिति आहे, मुहूर्त चांगला साडेदहाला आहे.

"अगं गडबड करू नको तर काय करू? सव्वादहाला तरी घरातून बाहेर पडायला पाहिजे ना ? आणि अजून तुझी साडीसुद्धा बदलायची आहे."

' हे बघा पांच -दहा मिनिटं इकडे तिकडे झाली तरी कांही बिघडत नाही. तुमची तिथं कोणीही वाट बघत नाहीये."

"माझे आई, खरायं तुझं ! कुठं वेळेवर जायचं म्हटलं कि तुम्हां बायकांचं हे नेहमी असंच असतं."

हा आम्हा दोघांच्यात नेहमी घडणारा संवाद. (की वाद.) बरोबर पंधरा दिवसांपूर्वीच याची पुनरावृत्ती झाली. आता मला सांगा, लग्नाला जायचं म्हणजे वधू-वरांच्या डोक्यावर अक्षता पडेपर्यंत तरी गेलं पाहिजे का नको ? का फक्त पुरव्वा झोडायला जायचं ? पण प्रत्येक वेळी नाहक धावपळ केल्याशिवाय बायकांना चैनच पडत नसावं. आणि पुन्हा "किती दमले" हे वर आहेच !

परवाचीच गोष्ट सांगतो ना. मी आणि सौ. बऱ्याच दिवसांनी एकत्र असे फिरायला बाहेर पडलो. फिरायचा आमचा नेहमीचाच रस्ता. शंभरफुटी रोड ! काय गंमत आहे पहा- फिरायला बाहेर पडलं की- नको ती आणि कधी नव्हे ती माणसं अगदी नेमकी भेटतात. मग एकमेकांची वास्तपुस्त, तुझं कसं-माझं कसं हे ओघानं आलंच. प्रत्येकाबरोबर पाच-दहा मिनिटं गप्पा म्हणजे फिरण्याच्या नावानं बेंडबाजा ! मला हे अजिबात आवडत नाही. फिरणं म्हणजे चांगली ४०/५० मिनिटं झपाझपा चालणं ही माझी व्याख्या. पण माझ्या बायकोला (पर्यायानं बहुतांशी बायकांना) हे पटत नाही. वाटेत कोणीही भेटो - मग ती भांडेवाली असो, शेजारीण असो की एखादी निव्वळ तोंड-ओळख असलेली काकूबाई असो, चांगल्या १०/२० मिनिटांच्या गप्पा मारल्याशिवाय हिला जमतच नाही. तर काय सांगत होतो ? हां, परवा फिरायला बाहेर पडलो आणि दहा मिनिटातच हिची एक मैत्रिण भेटली. आता माझी पद्धत काय तर कोणी भेटलंच तर सस्मित चेहऱ्यानं हात उंचावला की झालं. सगळं ठीक-ठाक चाललंय हे तोही समजतो आणि आपल्याला कळतं. पण हिचं तसं नाही. दोघींचं जे गुफ्तगू सुरु झालं ते काही संपायची चिन्ह दिसेनात. मी आपला १०/२० पावलं पुढं जाऊन रेंगाळत राहिलो. १० मिनिटं झाली, वीस झाली तरी बोलणं काही आवरेना. मला थोडासा रागच आला. म्हटलं की प्रयोग करून पहावा. तसाच पुढं सटकलो. मागं वळून न पाहता तसाच जात राहिलो. तिच्या न संपणाऱ्या गप्पांमुळे आपण रागावलोय एवढं तरी कळेल अशी आशा करीत थेट एस.टी.कॉलनीतल्या गणपतीपर्यंत गेलो. दर्शन करून मागे फिरलो तरी वाटेवर कोणी दिसेना. म्हटलं बहुधा ही अर्ध्या वाटेवरूनच परत गेली असावी. असा विचार करीत करीत आणि आपल्या कृतीचं मनातल्या मनात समर्थन करीत पुन्हा मूळ जागेपर्यंत आलो. तर काय ? अर्धा तास उलटून गेला होता तरीसुद्धा दोघींच्या गप्पा अगदी दिलखुलासपणे चालू होत्या ! मात्र मी दिसताच हिनं लगबगीनं गप्पा आवरल्या आणि माझ्याबरोबर चालत म्हणाली - "बरं झालं तुम्ही एकटेच गेलात ते. आज जरा फिरल्यासारखं वाटत असेल!" माझ्या तापलेल्या मनावर हिचा थंडगार प्रतिसाद पाहून आपोआपच शब्द बाहेर पडले - "धन्य तुझी आणि तुम्हां बायकांची ! तुम्हां बायकांचं हे नेहमी असंच असतं."

साडी खरेदी आणि बायका हे काय अफलातून मिश्रण आहे हे मला समजतच नाही. अहो, मीच काय भल्या-भल्यांनीही या प्रकरणात आपले दोन्ही हात टेकलेले आहेत. कविवर्य मंगेश पाडगावकरांनी आपल्या 'बोलगाणी' या संग्रहातील एका कवितेत या प्रसंगाचे फार सुरेख वर्णन केले आहे. ते म्हणतात - नवं दुकान, जुनं दुकान, उंच दुकान, गिड्डं दुकान, तळघरातलं दुकान, माडीवरचं दुकान, कोपऱ्यावरचं दुकान, चौकातलं दुकान अशी तीस दुकानं धुंडाळून सुद्धा राणीसाहेबांना काही साडी पसंत पडेना आणि अखेर जेव्हा पसंती झाली तोपर्यंत पायांचे खुंट अगदी मोडून गेले होते.' बाकी साडी दाखविणाऱ्या लोकांची मला कमाल वाटते. न दमता, न कंटाळता अगदी हसऱ्या चेहऱ्याने तो साड्यांची भेंडोळी बायकांपुढे उलगडत असतो. हा रंग तुम्हांला कसा उठून दिसेल, या साडीचा पोत कसा चांगला आहे, या प्रकारच्या नव्याण्णव साड्या खपून ही एकच कशी (तुमच्यासाठी) उरली आहे, हा प्रकार ऐश्वर्या राय नेहमी कसा वापरते - एक ना दोन - हजार गोष्टी सांगत तो एकामागून एक साड्या उलगडत असतो आणि साड्यांचा आणि आपला काहीएक संबंध नाही अशा आविर्भावात मख्ख चेहऱ्याने बायका त्याकडे दुर्लक्ष करीत असतात ! एकावर एक पडणारे हे साड्यांचे ढीग पाहून मला चक्क महाभारतातील श्रीकृष्ण आठवतो - कौरवांच्या सभेत द्रौपदीला अखंडपणे साड्या पुरवणारा श्रीकृष्ण ! फरक एवढाच की तिथं अखंडपणे साडी मिळणं हे द्रौपदीचं सर्वस्व होतं आणि त्यासाठी ती श्रीकृष्णाच्या विनवण्या करीत होती. तर इथं एखादं दुसरी साडी एवढंच बायकांचं उद्दिष्ट असतं आणि लवकर पसंत पडो अशी दुकानदाराची प्रार्थना असते ! आता समस्त नवरे वर्गाचा हा अनुभव असताना प्रत्येकाच्या तोंडातून आपोआपच शब्द येतात - "तुम्हा बायकांचं हे नेहमी असंच असतं !"

"सृष्टी-निर्मात्या ब्रह्मदेवालाच जिथं स्त्री समजली नाही, तिथं माणसाची काय कथा" असं एक संस्कृत वचन आहे. निरनिराळ्या प्राचीन धर्मग्रंथांमधूनही स्त्री-मनाचा/स्वभावाचा वेध घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. पण आजपर्यंत कोणाला त्याचा अंत लागला आहे असे मला वाटत नाही. गदिमांच्या शब्दांत थोडासा बदल करून "स्त्री स्वभावाशी थांबे तर्क जाणत्याचा" असं म्हणायलाही काही

हरकत नाही असं मला वाटतं. एक गोष्टच सांगतो म्हणजे माझे म्हणणे आपण गुमान मान्य कराल.

आमच्या जुन्या वाड्यातल्या काशीबाई आणि भीमाताई या अगदी सख्ख्या शेजारणी. दोघींच्या घराला एकच कॉमन भिंत. पण काय कोणास ठाऊक, दोघींचं अगदी साता-जन्माचं वैर ! परस्परांची उणी-दुणी काढणं, एकमेकांवर कुरघोडी करणं हे अगदी नित्याचच. एकही संधी वाया म्हणून जाऊ देणार नाहीत. तर काय झालं - काशीबाई सोळा सोमवारचं कडक व्रत करीत होत्या. म्हणता म्हणता तेरा सोमवार पार पडले. व्रत अगदी छान चाललं होतं. श्रीशंकर प्रसन्न झाले आणि चौदाव्या सोमवारच्या रात्री काशीबाईंच्या स्वप्नांत प्रगट झाले. म्हणाले, ''वत्से, तुझ्या भक्तीवर मी अगदी प्रसन्न आहे. वर मागून घे.'' अनोख्या अनुभवाने काशीबाई गोंधळल्या त्यांना खरंच वाटेना. शंकास्पद मनाने त्यांनी विचारले, ''देवा खरंच वर मागू ?'' खुशाल माग. पण अट एकच आहे - जे मागशील ते तुला मिळेल पण तुझ्या दुप्पट शेजारणीला मिळेल.'' दिवसभराच्या उपवासाने काशीबाईंना चांगलीच भूक लागली होती. शिवाय खरं का खोटं याचाही अंदाज येत नव्हता. त्यांनी अधिरतेने सांगितले - ''देवा, पंचपक्वानानं भरलेलं एक ताट मला द्या.'' ''तथास्तु!'' म्हणून शंकर अंतर्धान पावले आणि काशीबाई खडबडून जाग्या झाल्या. पहाट होत आली होती आणि साऱ्या घरभर सुग्रासाचा मंद दरवळ पसरला होता. काशीबाई लगबगीने स्वयंपाकघरात गेल्या तर कार्य आश्चर्य - पंचपक्वान्नाने भरलेलं ताट वाढून तयार होते ! काशीबाईंना खूप आनंद झाला पण लगेच त्या अटीची आठवण झाली. भिंतीला कान लावून त्यांनी शेजारचा कानोसा घेतला तर पक्वान्नांच्या दोन ताटांबद्दल भीमाताईंची कुजबूज त्यांना ऐकू आली. काशीबाईंच्या अंगाचा तीळपापड झाला. पण करणार काय ? अटच तशी असल्यामुळे त्यांचा नाईलाज होता.

असाच आठवडा गेला. पुढचा सोमवार आला. दिवसभराचा उपवास करून काशीबाई झोपी गेल्या आणि आश्चर्य म्हणजे शंकर पुन्हा स्वप्नात आले, म्हणाले -''वर मागतेस ना ?'' काशीबाईच त्या. पुन्हा गोंधळल्या. अट विसरल्या. म्हणाल्या - ''देवा, मला पिशवीभर सोन्याच्या मोहरा दे.'' 'तथास्तु' म्हणून शंकर गुप्त झाले. काशीबाईंना सकाळी जाग आली. स्वप्न आठवलं आणि जाऊन बघतात कर काय मोहरांनी भरलेली पिशवी टेबलावर ठेवलेली !

त्यांना काही सुधरेना. मोहरा मिळाल्याचा आनंद मानावा, की दुप्पट मोहरा भीमाताईला मिळणार याचं दु:ख मानावं असा संभ्रम निर्माण झाला. शेवटी स्त्री-स्वभावानं कुरघोडी केली. नुसता जळफळाट झाला. आपण एवढे कष्ट करून श्रीशंकराला प्रसन्न करून घेतले पण त्याचे फळ भीमाताईला कां ? आणि तेही दामदुप्पट ! नाही, असं होता कामा नये. काहीतरी युक्ती मला केलीच पाहिजे या विचाराने त्या सैरभैर झाल्या. विचार करून करून अगदी डोकं फुटायची पाळी आली पण तोडगा काही सापडेना. पुढचा सोमवार जसजसा जवळ येऊ लागला तसतशी त्यांची अस्वस्थता वाढू लागली. शेवटी गेली ४० वर्ष त्यांच्या जमिनीची केस लढवणाऱ्या ठिगळे वकिलांची त्यांना आठवण झाली. पेच टाकून विरूद्ध पार्टीला अडचणीत कसं आणावं यात ते माहीर होते. लगबगीने काशीबाईंनी त्यांचे घर गाठले. पण हाय रे दैवा. ते नेमके चार दिवसांसाठी परगावी गेले होते ! वस्ताद वकिलांची बायकोही सवाई वस्ताद असणार हे हेरून त्यांनी आपली व्यथा सौ.ठिगळेच्या कानावर घातली. वकिलीण बाईंनी २/४ मिनिटं विचार केला आणि त्या काशीबाईंच्या कानात काहीतरी पुटपुटल्या. काशीबाईंनी अगदी खुशीनं मान डोलावली. अखेर तोडगा सापडला होता. फक्त श्रीशंकरच काय ते स्वप्नात यायचे राहिले होते.

आणि सोमवार उजाडला. मावळला देखील. ठिगळेबाईंचा तोडगा मनात घोळवतच काशीबाई झोपी गेल्या. यथावकाश शंकर स्वप्नात आले आणि म्हणाले - ''आज शेवटचा सोमवार. माझे व्रत पूर्ण केलेस. मी प्रसन्न आहे.''

''मग वर मागू ना ?'' काशीबाईंनी अधीरतेने विचारले, ''अगदी खुशाल. पण हा वर शेवटचाच आणि माझी अट लक्षात आहे ना ?'' शंकर उत्तरले.

''होय देवा. तुमच्या शेवटच्या वराने माझा एक डोळा जाऊ दे'' काशीबाईंनी वेळ न दवडता सांगून टाकले.

'तथास्तु' म्हणत शंकर अंतर्धान पावले.

इकडे काशीबाईंना जाग आली. उरलेली रात्र त्यांनी कशीतरी तळमळून काढली आणि सकाळी उठून बघतात तो त्यांचा डावा डोळा निकामी झाला होता ! त्या घाबरल्या. आपण स्वप्नात काय मागून बसलो याची त्यांना खंत वाटू लागली आणि रडूही येऊ लागलं. तोपर्यंत शेजारच्या भीमाताईंचे दोन्ही डोळे गेल्याची बोंबाबोंब सुरू झाली होती.

आता मलाही राहवेना. मागील दारी गेलो आणि काशीबाईंच्या भिंतीला कान लावला. त्यांचा नवरा म्हणत होता - ''अगं शेजाऱ्याचा किती दुस्वास करायचा. शेजारणीला धडा शिकवायला गेलीस खरं, पण तुला केवढी मोठी शिक्षा मिळाली आहे याची काही कल्पना आहे का ? आता भोग आपल्या कर्माची फळं ! तुम्हा बायकांचं ना नेहमी असंच असतं.''

काय, आवडली ना गोष्ट ? यातील अतिशयोक्ती सोडा, पण थोड्या फार प्रमाणात हे असंच असतं-पटलं असेल तुम्हांला.

अर्थात स्त्रियांची ही एकच बाजू लक्षात घेऊ नका हं. त्यांच्या बाबतीत खूप चांगल्याही गोष्टी आहेत. आणि त्या केवळ स्त्रियांमध्येच बघायला मिळतील. सत्य घटनांच सांगतो - प्रत्यक्ष माझ्या अनुभवाची!

झाली १५/१६ वर्ष. माझं दुर्दैव असं की कॅन्सरसारख्या महाभयानक रोगानं माझ्याशी दोस्ती केली. आता कॅन्सर म्हणजे जगणंच कॅन्सल ! तेव्हा घरा-दाराची उलथापालथ झाली. सर्वांच्या

तोंडचं पाणी पळालं. हा डॉक्टर, तो वैद्य, अमुक औषध आणि तमुक उपचार ! ऑपरेशन झालं, रेडिओथेरपीचे उपचार सुरू झाले. जीवघेण्या उलट्या आणि ओकाऱ्यांनी जीव हैराण झाला. औषध/गोळ्यांनी तोंड कडुशार झालं. थोड्याच दिवसात तब्येत अगदी तोळामासा झाली. अशा नैराश्याच्या गर्तेत असताना जगण्याची नवी उमेद मला या महिला वर्गानं मिळवून दिली. वृद्ध आईचा देवाकडं अखंड धावा सुरू झाला. भावंडं, जवळचे नातेवाईक हरप्रकारच्या मदतीला तत्पर झाले. बहिणींनी तर सर्व देवांना साकडं घातलं/एकत्र बांधलं. कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानी, कोकणातला हरिहरेश्वर, सोलापूरचा सिद्धेश्वर, यलगूरचा मारूती, शिर्डीचे साईनाथ आणि अक्कलकोटचे स्वामी समर्थ कोणालाही मोकळं सोडलं नाही. नवस आणि उपवासाने स्वत:चे शरीर कष्टवायची कामं अगदी जोरात सुरू होती. सौ.चं तर काही विचारू नका. न दमता, न कंटाळता, अहोरात्र ती माझ्या सर्व प्रकारच्या सेवेला सतत उभी होती. मला बरं करण्याच्या एकाच ध्यासापोटी तिनं स्वत:चं सारं आयुष्यच पणाला लावलं होतं !

सर्वांनी एकजुटीने केलेले प्रयत्न अखेर फळाला आले. 'भगवान के घरमें देर है लेकिन अंधेर नहीं ।' याचा प्रत्यय आला आणि मला चक्क बरं वाटू लागलं. कॅन्सरच्या विळख्यातून मी पूर्णपणे मुक्त झालो. अशाच एका निवांत संध्याकाळी घरातल्या बायका गप्पा मारत बसल्या होत्या. विषय अर्थातच या जीवघेण्या आजाराचा. माझ्यासाठी प्रत्येकीनं, आपापल्या परीनं जे कष्ट सोसले होते त्याला फळ आल्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. त्यांच्या गप्पा ऐकता ऐकता माझं मन नकळत हेलावून गेलं, गहिवरानं डोळ्यात अश्रू दाटून आले आणि तोंडातून अस्फुट शब्द निसटले - ''आपल्या माणसावर जीव लावावा तो तुम्ही बायकांनीच ! तुम्हां बायकांचं हे नेहमी असंच असतं !''

- **गोविंद शंकर करमरकर,** सांगली

## नियतीचा न्याय !

वार्षिक अहवाल तयार करून स्टॅट्यूटरी ऑडिटची वाट पाहात होतो. एप्रिलचा महिना. लागोपाठ सुट्ट्या. हे सर्व सांभाळून पाच मिनिटे निवांत होऊन अनुत्पादित कर्जाचा N.P.A चा विचार करीत होतो. तेवढ्यात फोन खणखणला. पलिकडून विश्वास मुळे बोलत होता.... ''साहेब, तुमची मदत हवी आहे. माझ्या सर्वस्वाचा प्रश्न आहे. मला तुमच्याबरोबर महत्त्वाच्या विषयासंबंधी बोलायचे आहे. नाही म्हणू नका. त्यासाठी तुम्ही काहीही करून रविवारी माझ्या घरी जेवायला आलात तर निवांत बोलता येईल. मला तुमच्या मार्गदर्शनाची खूप गरज आहे. मी रविवारी तुमची वाट पाहतो. जेवायला नक्की या.''

विश्वासची कळकळ त्याच्या शब्दातून मला जाणवली. मी त्याला हो म्हटलं आणि ठरल्याप्रमाणे रविवारी मी त्याच्या घरी दाखल झालो. घरात वातावरण अगदी आनंदी अन् उत्साहपूर्ण होतं. मी चकित होऊन विश्वासला विचारलं, ''आहे तरी काय आज तुझ्या घरी ? सत्यनारायण तर दिसत नाही. माझ्या स्मरणशक्तीप्रमाणे आज तुमच्यापैकी कुणाचा वाढदिवस देखील नाहिये. कशासाठी मला एवढं तातडीने बोलावलंस ते तरी सांग.''

पण माझा मित्र विश्वास गप्पच होता. तो विषयच काढीना. दुपारचे जेवण झाले. सौ.ने चहा करून आणून दिला. शेवटी तिनेच विषयाला तोंड फोडले. ती म्हणाली, ''अहो साहेब, आपल्या अमृताची पत्रिका श्री.सदानंद ठोसर यांच्याकडे पाठवली होती. त्यांचं उत्तर आलं आहे की पत्रिका उत्तम जुळते आहे. श्री.ठोसर यांचा मुलगा इंजिनियर आहे आणि तो एका बहुराष्ट्रीय कंपनीत मोठ्या हुद्यावर नोकरीला आहे. त्याचा दादरसारख्या मध्यवर्ती ठिकाणी चार रूम्सचा प्रशस्त फ्लॅट आहे. त्यांनी आपल्या अमृताला दाखवायला बोलावले आहे. श्री.ठोसर हे रिझर्व बँकेतून वरिष्ठ अधिकारी म्हणून नुकतेच निवृत्त झाले आहेत. त्यांची स्वत:ची गाडीदेखील आहे. आता एवढ्या मोठ्या घरी मुलीला दाखविण्यासाठी जायचं त्यामुळे आम्हाला खूपच टेन्शन आलेले आहे. तुम्ही आमच्या बरोबर आलात तर आमचं टेन्शन कमी होईल. तुमचं व्यक्तिमत्त्व आणि तुमचा बँकेतील शाखा व्यवस्थापक-मॅनेजर-हा हुद्दा यामुळे आम्हाला नैतिक बळ मिळेल. मुलीला दाखविण्याचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडेल. आपण आमच्या बरोबर याच. आपणाला त्रास होऊ नये म्हणून आम्ही भाड्याने गाडी मागवली आहे. मुलूंड ते दादर अंतर गाडी केव्हाच पार करील. तुम्हीच पुढाकार घेऊन आमच्या वतीने बोलावं अशी आमची इच्छा आहे. मोठ्या बड्या घरच्या स्थळामुळे आमच्या मनावर दडपण आलं आहे कारण हे बँकेत फक्त हेड क्लार्क आहेत. म्हणून आम्ही तुम्हाला गळ घालतो आहोत.''

अमृताला मी गेली २३ वर्षे पाहतो आहे. अगदी तिच्या जन्मापासून. ती दिसायला खूपच सुंदर आहे. तिची वाणी म्हणजे नावाप्रमाणे जणू अमृतच. तिनेसुद्धा V.J.T.I मधून प्रथम वर्गात इंजिनियरची पदवी संपादन केलेली आहे. ती एका मोठ्या कंपनीत संगणक विभागात कार्यरत आहे. विश्वासने बँकेतून कर्ज काढून अमृताला इंजिनियर बनवले होते. मुलीमध्ये नाकारण्यासारखे काहीच नव्हते. मी एक सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून त्यांच्याबरोबर जायला तयार झालो.

संध्याकाळी ठीक ५ वाजता दादरला श्री.ठोसर यांच्या घरी आम्ही

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा- पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, दादर, मुंबई

चौघेजण पोचलो. त्यांचा फ्लॅट प्रशस्त होता. आठव्या मजल्यावर त्यांच्या फ्लॅटमध्ये आम्ही प्रवेश केला. विश्वास एकदम दडपून गेला. त्याच्या सौ.ने मला ओळख करून द्यायला सुचवले. हॉलमध्ये श्री.ठोसर व त्यांचे चिरंजीव बसले होते. आधुनिक पद्धतीनुसार ठोसर यांचे चिरंजीव पंकजची अमृताबरोबर ओळख करून देऊन त्यांना संवाद करण्याची संधी देऊन आम्ही दुसऱ्या खोलीत गेलो. श्री.ठोसर यांची सुविद्य पत्नी आशा ही माझी जुनी सहकारी असल्याचं समजलं. आमची ओळख निघाल्यामुळे सर्वांनाच हायसं वाटलं. तिने स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेली होती. माझ्या हाताखाली तिने पूर्वी वर्षभर काम केलं होतं.

विश्वासची सौभाग्यवती व सौ.आशा ठोसर स्वयंपाक घरात हितगूज करीत बसल्या. बाहेरच्या खोलीत श्री.ठोसर व विश्वास यांच्यात गप्पा चालू होत्या तर दुसऱ्या खोलीत पंकज व अमृता यांच्यात संवाद रंगला होता. एकंदरीत सर्व व्यवस्थित चालू होते. संध्याकाळचे ७ वाजले. सौ.ठोसर यांनी नोकराकरवी बाहेरून पावभाजी व चहा मागवून प्रसंग निभावून नेला. सर्व कार्यक्रम आटोपून आणि त्यांचा निर्णय लवकर कळवा अशी त्यांना विनंती करून आम्ही ठोसर मंडळींचा निरोप घेतला.

पुढे सौ.आशा ठोसर यांचं पत्र आम्हाला मिळालं आणि आम्हाला धक्काच बसला. त्यांनी कळवलं होतं की तुमची मुलगी खूप सुरेख आहे, चांगली नोकरीही आहे. आमचा मुलगाही सुरेख आहे. नोकरी उत्तम आहे. पण मुलगी नगरपालिकेच्या शाळेत शिकलेली आहे आणि तिला कॉन्व्हेंटचे वातावरण परिचयाचे नाही. तिला पगारही फक्त तीन हजार रूपये. आमच्या मुलाला अठरा हजार रूपये पगार आहे. आम्ही दोघेही बँकेत अधिकारी. श्री.विश्वास बँकेत केवळ हेड क्लार्क (म्हणजे कारकूनच) आणि त्यांची सौ.साधी हाऊस वाईफ (गृहिणी). तेव्हा आपण मुलीसाठी दुसरे स्थळ पाहावे.

मी ते पत्र पाहून चपापलोच. कारण सौ.ठोसर जरी कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिकलेल्या असल्या तरी त्यांचे काम व बुद्धिमत्ता किरकोळ व सामान्य दर्जाचीच होती. हे मी स्वत:च अनुभवले होते.

सौ.ठोसर यांना मी प्रश्न केला, ''पंकज किती वाजता घरी येतो?'' सौ.ठोसर उत्तरल्या, ''सकाळी ७ वाजता कंपनीची गाडी घरी येते आणि त्याला घेऊन जाते. रात्री १२ वाजता तो परत येतो. रविवारी सुद्धा त्याला कंपनीत जावं लागतं. खूप काम असतं.''

मी विचार केला आणि म्हटलं या दोघांचं जमणं कठीणच होतं. एका अर्थी त्यांचं लग्न जमलं नाही ते बरंच झालं. कारण पंकज आता ३७ वर्षांचा झाला आहे अजूनही अविवाहित आहे. तर अमृता लग्न होऊन सुखी झाली आहे. तिचा छोटू आज नर्सरीत जातो आहे. अखेर नियतीनेच योग्य तो न्याय दोघांच्याही पदरात टाकला आहे !

– **श्री.अशोक बुटाला,** पवई, मुंबई ७६

## व्यक्ति-विशेष

## श्री.अशोक वाकचौरे - एक प्रवासी

प्रवासाचा षोक करणारे श्री.अशोक वाकचौरे नुसताच प्रवास करीत नाहीत. तर रसाळ भाषेत ते प्रवास वर्णन लिहून ठेवतात.

श्री.वाकचौरे पुण्यातील सभासदांना चांगलेच परिचित आहेत. प्रवासात नसले अन् पुण्यात असले तर आपल्या इतर सहकाऱ्यांसोबत असोसिएशनचे वाचनालयदेखील ते चालवतात.

बँकेत सेवा करीत असतांना आत्यंतिक प्रवासाची आवड जोपासणाऱ्या श्री.वाकचौरे यांनी बँकेने दिलेल्या L.T.C. (Leave Travel Convession) चा पुरेपूर फायदा करून घेतला (अर्थात हा फायदा आपण साऱ्यांनीच घेतला आहे) पण सेवानिवृत्तीनंतरही त्यांचा प्रवास चालूच आहे. संपूर्ण भारत भ्रमण त्यांनी पूर्ण केलेले आहेच. पण प्रवासाबरोबर हिमालयातील अनेक ठिकाणी साहसपूर्ण ट्रेकिंग ही केले आहे.

महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व महत्त्वपूर्ण किल्ले त्यांनी 'सर' केले आहेत. शिवाय महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर सह्याद्रीतील कळसूबाई ट्रेकिंग करून गाठले आहे.

भारताशिवाय युरोपमधील नऊ देश आशिया खंडातील सिंगापूर पटाया, बँकॉक ह्या सहलीही त्यांनी पूर्ण केल्या आहेत.

दोन वर्षांपूर्वी त्यांचे 'माझा प्रवास माझे अनुभव' हे प्रवास वर्णनाचे पुस्तक पुणे येथील पृथ्वीराज प्रकाशन ह्या संस्थेने प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी प्रातिनिधीक अशा पंधरा महत्त्वपूर्ण स्थळांवर लेख लिहिले आहेत. अत्यंत सोप्या व ओघवत्या शैलीत त्यांनी सर्व लेखन केले आहे. कमी-अधिक प्रवास आपण सर्वत्र करीत असतो आणि बहुतेक लोकांना प्रवासाची आवड असतेच. पण आपल्यापैकी कितीजण ते शब्दबद्ध करून ठेवतात? प्रवासातील विविध अनुभव हे लिहून ठेवल्यास त्याचे इतरांना मार्गदर्शन होऊ शकते. प्रत्येक स्थळाचे, विभागाचे प्रदेशाचे एक वेगळे वैशिष्ट्य असते ते बारकाईने बघून अभ्यासावे लागते आणि ते नोंदवून ठेवावे लागते. म्हणजे त्याचा उपयोग नंतर जाणाऱ्यांना किंवा भावी पिढीला होत असतो.

आपण स्वत: प्रवास न करताही अशी उत्तम प्रवास वर्णने वाचून जणू काही आपणच प्रवास करीत आहोत असा अनुभव आपल्याला येतो. प्रवास वर्णन लिहिणे हा सुद्धा वाङ्मयाचा एक भाग आहे. जसे काव्य, नाटक, कादंबरी, चरित्रे, निबंध इ.

श्री.अशोक वाकचौरे यांनी त्यांच्या विविध प्रवास वर्णनात, आलेले अनुभव, मोकळ्या अन् मोजक्या शब्दातून व्यक्त केलेले आहेत, त्यामुळे त्यांची प्रवास वर्णने जिवंत वाटतात.

विविध प्रवासांचे अनुभव त्या त्या प्रदेशांतील वैशिष्ट्यांसह त्यांनी वर्णन करून ठेवले आहेत. त्यापैकी काही लेखन, त्यांच्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या 'सदाबहार' ॲस्कापच्या 'प्रज्योत' आणि आपल्या 'संवाद' या आणि इतर नियतकालीकातून वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहे व होत आहे. त्यांचे प्रवास व प्रवास वर्णनांचे लेखन अजूनही चालू आहे. तो त्यांचा आत्यंतिक आवडीचा छंद आहे.

त्यांनी जोपासलेल्या ह्या प्रवासी छंदाला 'संवाद' च्या शुभेच्छा !

अशोक वाकचौरे म्हणजे गीतकार शैलेंद्रच्या शब्दात -

मैं राही भटकनेवाला हूँ ।
और प्रवासी मतवाला हूँ ।।

- वसंत धुपकर

## पांढरे केस, हिरवे मन !

आरशात नेहमीसारखा बघितला...........
जेव्हा मी माझा चेहरा............
अचानक दिसला त्या दिवशी ..............
तो, एक केस पांढरा................. ॥१॥

डोक्यावर डौलाने डोलत होता.............
तो, एक केस पांढरा..........
जणू काही, काळ्या आकाशात............
चमचमणारा शुभ्र तारा................ ॥२॥

शिकेकाईने डोके वारंवार धुतले................
त्या बेट्याने मात्र स्थान नाही सोडले
वाकेन पण मोडणार नाही, अशी त्याची वृत्ती
मनातून मी झालो, दु:खी-कष्टी ............. ॥३॥
एक मन म्हणालं..............

हा रुपेरी केस म्हणजे, आहे इशारा
आता तू, हळूहळू होशील म्हातारा
बाकीचे, काळे केसही होतील पांढरे पांढरे
आवरायला घे, तुझे भरकटलेले पसारे............... ॥४॥

दुसरं मन म्हणालं....................
बघून, एकच केस तो पांढरा...............
होऊ नकोस मुळीच घाबरा-घुबरा
टकलापेक्षा केस पांढरे झालेले बरे
तू आता वयस्क झाला, हे मात्र खरे .......... ॥५॥

पण वय प्रौढ झाले तरी मन ठेवा तरुण
पांढरे केस, हिरवे मन हे सांग गर्जून
पांढरे केस, हिरवे मन हे सांग गर्जून............. ॥६॥

- **अरूण भट**, बदलापूर (पूर्व)

## पाहुणे येती घरा

आज घर अगदी सुनं सुनं लागत होतं. नेहमीच्या दिनक्रमातून चार दिवस थोडा बदल झाला होता. वास्तुपूजनाच्या निमित्ताने चार पाहुणे आज नव्या घरात आले होते. दिनूने खूप छान घर बांधलं म्हणून कौतुक करीत होते. अक्कांनापण दिनूचं खूप कौतुक वाटत होतं. स्वबळावर आज एवढी मोठी वास्तू त्याने उभी केली होती. जुन्या दोन खोल्यांच्या घरातून इथे आल्यावर वेगळंच वाटत होतं. मोठं घर हवं म्हणून दिनूचा सारखा हेका होता. आज तो पूर्ण झाला. घरातले पाहुणे जाऊन दोन दिवस लोटले. सर्व आवराआवरी झाली. म्हणून आज कामपण नव्हतं आणि म्हणूनच आज घर सुनं सुनं वाटत होतं.

लीलाला, शरयूला राहण्याचा आग्रह केला. पण त्या रहायला तयार नव्हत्या. प्रत्येकाला आपआपल्या घरची ओढ होती. लीला व शरयूच्या बरोबर गप्पा मारण्यात रात्रीचा केव्हा एक वाजला ते कळलंच नाही. आक्कांना आपले पूर्वीचे दिवस आठवले.

त्यांच्या माहेरी त्यांचा फार मोठा वाडा होता. येणारा जाणाराचा सतत राबता होता. शेतीवाडी असल्याने बैलगाड्या होत्या. त्या बैलगाड्यांमध्ये बसायला काय मजा वाटायची. घुन घुन घुंगराचा आवाज अजूनही कानात घुमत असतो. लीला आणि शरयू आक्कांच्या मोठ्या वहिनी. त्यांना खूप आठवणी येत होत्या. शरयू म्हणाली, ''काय ग लीले, आपण किती भांडत होतो नाही ?'' ही आक्का सतत आपल्या मागे मागे असायची. आपण हिला नेहमीच कच्चं लिंबू समजायचो. ही कधी मोठी झाली कळलंच नाही.'' लीला म्हणाली होती, ''होना, आपण गोळा करून आणलेल्या चिंचा, आवळेही गुपचूप घेवून जायची ! भारीच मिष्किल होती ती. आईला जाऊन आपल्याच चुगल्या सांगायची. अस्सा राग यायचा नं तिचा. पण बाईसाहेब सर्वात लहान. आपण मोठं. म्हणून आई आपल्यालाच रागवयाची.''

आक्का म्हणाली, ''हो ना, खरंच मला तेव्हा काही समजत नव्हतं. तुम्ही दोघी मला कच्चं लिंबूच समजायच्या. मग मला पण खूप खूप राग यायचा.''

आपण वाड्यात किती छान छान खेळ खेळत होतो ना ! पिवळ्या फुलांच्या झाडाला लागलेल्या बिट्या आपण गोळा करून आणायचो. अन् बिट्या खेळून एकमेकींवर हांड्या बसवीत होतो. सागरगोट्या खेळत होतो. लगोरी खेळत होतो. त्यांच्या ह्या अशा गप्पांमध्ये आक्काची नात पण सामील झाली होती. तिला मात्र ह्या खेळांची नावं अनोळखवी होती. ती आजीला सारखे प्रश्न विचारीत होती. ''आजी बिट्या म्हणजे काय ग ? कशा खेळत होतात तुम्ही?'' हांड्या म्हणजे काय ?'' तिच्या ह्या प्रश्नांना त्या तिघीही हसत होत्या. ''थांब हं !'' लीलाबाईंनी तिला मध्येच थांबवलं. अन् म्हणाल्या ''उद्या सकाळी मी तुला खेळून दाखवीन. मात्र आता बिट्या मिळणार नाहीत

गं ! असं कर, तू गोल गोल खडे गोळा करून आणून ठेव. मग मी तुला शिकवीन ते कसं खेळायचे ते.'' आक्कांना हे सारे बोलणे आठवत होते. अन् खरंच सकाळी लीलाबाईंनी स्वत: खडे कसे खेळायचे हे शिकवले. लिलाबाई सहज खडा हाताने वर फेकून झेलायच्या. नात मात्र विस्मयाने बघतच राह्यली. पाहुणे येऊन चार दिवस कसे गेले कळलंच नाही. पूर्वी पाहुण्यांना आम्ही किती आग्रह करीत होतो. पुन्हा आक्काला आठवले ते दिवस. घरी कोणाची तार किंवा पत्र आलं की आम्ही ह्या ह्या दिवशी येणार आहोत म्हणून. तरी आम्हाला कोण आनंद व्हायचा.

विशेषत: ताई उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये यायची. बहुतेक करून मावशी आत्या ह्या पण यायच्या. त्या येणार त्या दिवसापासून आम्ही त्यांची वाट बघत असायचो. बाबा, दादा त्यांना घ्यायचा टांगा करून स्टेशनवर जायचे. केव्हा एकदा घोड्याच्या टापांचा आवाज कानी पडतो असं व्हायचं आणि दारात टांगा आला की आम्ही तिघी ''बाई आली, बाई आली'' किंवा मावशी, आत्या येणार असल्या तर, ''मावशी आली, मावशी आली, आत्या आली'' असे म्हणून धावत टांग्यापाशी जात असू. आत्याच्या हातातली बॅग उचलून घरात आणण्यात वेगळाच आनंद होता. मावशीची बॅग, वहिनीची बॅग उचलून घरात घेऊन जाण्यात सुद्धा आनंद होता. मग मावशी, आत्या, ताई आमचा गोड गालगुच्चा घ्यायची. घरातलं वातावरण खूप आनंदानं भरून जायचं. पण आमचं लक्ष सगळं बाई, मावशी, आत्या ह्यांच्या बॅगवर. हात-पाय धुऊन, चहा-पाणी करून, ताई केव्हा बॅग उघडते असं व्हायचं. बाईच्या नेहमी प्रमाणे हे लक्षात यायचंच. पण ती मिश्किलपणे लवकर बॅग उघडायची नाही. मग आमचा अंत पाहून झाला की हळूच बॅग उघडायची. आमच्यासाठी आणलेला खाऊ, कपडे ताई, मावशी व आत्यासुद्धा द्यायची. किती कौतुक होतं तेव्हा सर्वांना. प्रत्येकाकडून परत काहीना काही आम्हाला मिळायचं. आम्ही त्यांच्या घरी जायचो. तेव्हा आईपण सर्वांसाठी काहीना काही न्यायची. आंब्याच्या पोळीचा तर वेगळाच स्वाद असायचा. आंब्याच्या दिवसात आम्ही खूप धम्माल करायचो. सर्व जमले की दुपारी पत्त्यांचा डाव असायचा. तोही खूप रंगायचा. रात्री आईस्क्रीम, लाकडी पॉटमधलं, केव्हा ते होणार अन् केव्हा पोटात जाणार असं व्हायचं. पण त्या पॉटमधल्या आईस्क्रीमची चवच न्यारी हं ! आंब्याच्या रसाची मजा काही औरच. कितीही रस खाल्ला तरी माच लावलेल्या खोलीतून आंबे सगळ्यांच्या नकळत खायचेच खायचे.

मग भेंड्या खेळायचो. लीला अन् शरयू फार पक्क्या. आम्हा चिल्लर खुर्दांना त्या हरवायच्याच. पण यातही एक वेगळाच आनंद असायचा.

ताईची घरी जायची वेळ आली की आम्हाला मात्र खूप वाईट वाटायचं. ती पण हळूच पदराने डोळे पुसत असे. आईच्या हृदयात तर फार कालवाकालव व्हायची. बाईबरोबर काय देऊ अन् काय नको असं तिला व्हायचं. ताईची किंवा मावशी अथवा आत्याची घरी जायची वेळ आली की आम्हाला कसंसच व्हायचं. आम्ही रात्री त्या झोपल्या की साडीचा पदर एकमेकींच्या साड्यांना बांधून ठेवायचो. सकाळची वाट बघत राह्यचो. सकाळ झाली की एक एकजण उठत असे. अन् उठल्यावर एकदम पदराला ओढल्यासारखं त्यांना जाणवायचं. मग लक्षात यायचं की ह्या कार्ट्यांनी आपल्या साड्या बांधून ठेवल्या. आम्ही पांघरुणातल्या पांघरुणात हसत असायचो.

टांगा दाराशी आला की आम्ही त्यांनी जाऊ नये म्हणून चपला लपवून ठेवायचो. कधी त्यांच्या बॅगा लपवून ठेवायच्या. मग आई-बाबा रागावले की ते त्यांना द्यायचं. उद्देश हाच की त्यांनी कधी जावूच नये. पाहुणे आले की खूप खूप आनंद व्हायचा. उन्हाळा असो, पावसाळा असो, कोणाचा विवाह असो, बारसं असो, कोणी आलं की आम्हाला आनंद होत होता. आमच्या आई-बाबांना पण खूप आनंद होत होता.

पण आता मात्र तो आग्रह नाही की तो आनंद नाही. महागाईने सर्वांचा घास घेतला आहे. सर्वच कसं सुनं सुनं वाटत आहे. पूर्वी कोणत्या ना कोणत्या निमित्ताने घरातले सर्व यायचे. आता फक्त एकच येतो. एकच जातो. पाहुणा म्हणून पाहुणाच राहतो.

**- सौ.अनघा आनंद नागराज**, बुलढाणा

## 'संवाद' लेखकांना महत्त्वाच्या सूचना

'संवाद' साठी साहित्य पाठवताना खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे :

१) आपले साहित्य (अंदाजे ७५० ते १००० शब्दांच्या मर्यादित) आखीव फूलस्केप कागदावरच भरपूर समास सोडून लिहिलेले असावे. ते कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे. पाठपोट लिहू नये. अक्षर वाचनीय असावे.

२) साहित्याची 'मूळ प्रतच' पाठवावी. झेरॉक्स प्रत स्वत:कडे ठेवून घ्यावी.

३) अस्वीकृत साहित्य परत पाठवले जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

४) साहित्यासोबत पाठवलेल्या पत्रात लेखकाने पत्ता (पिनकोड सहित), सभासद क्रमांक - तसेच साहित्याच्या शेवटच्या पानावरही पूर्ण नांव, पत्ता, पिनकोड, सभासद क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

५) एकापेक्षा जास्त कविता पाठवतांना प्रत्येक कवितेस वेगळा कागद वापरावा. प्रत्येक कवितेखाली, नावं, पत्ता, सभासद क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

६) वरील सूचनांकडे दुर्लक्ष करून आलेले साहित्य 'संवाद' मध्ये प्रसिद्ध केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Articles in English are also invited from the members within limits of words specified above (around 750 to 1000 words) by the Editorial Board.

Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004
SSPO Pune under Postal Concession register No. L2/RNP/M/318/04-07 Date :13/05/2004
Licence to post without Prepayment No. : LWP-217 at Market Yard PSO, Pune - 37
on 25th of each Month

## प्रतिक्रिया

आपणा सर्वांनी चालवलेल्या उत्कृष्ट 'संवाद' मासिकाचे appreciation म्हणून रू. १०१/- ची देणगी पाठवत आहे. दर महिन्याला येणाऱ्या या अंकाची मी उत्सुकतेने वाट बघत असते. निवृत्तीनंतर सुद्धा उत्साहाने, जोमाने आपण सर्व जे काम करीत आहांत, हे खरोखरच अभिनंदनीय आहे.

**- सौ.निलिमा प्रताप वळामे,** पुणे

********

आपल्या संस्थेचे मुखपत्र 'संवाद' चा अंक पांचवा, जून २००७ चा अंक मिळाला. पाहून आणि वाचून समाधान झाले. 'संवाद'चा अंक आम्हाला नियमितपणे मिळत असतो. माझी पत्नी देखील 'संवाद'ची वाटत पहात असते. मासिकातील संपादकीय छानच आहे. श्री.बी.जी.दांडेकर ह्यांचा श्री.मधुकर दिगंबर पालकर ह्यांच्या संबंधीचा लेख हा माहितीपूर्ण आहे.

श्री.एकनाथ के. ठाकूर, आपले माजी अधिकारी आणि आता लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार ह्यांनी अत्यंत आत्मीयतेने सेवानिवृत्तांचे गाऱ्हाणे, आपल्या देशाचे माननीय वित्तमंत्री श्री.पी.चिदंबरम्, ह्यांचे कडे कळकळीने आणि तळमळीने मांडलेले वाचून मन कसे भरून आले.

शेवटी श्री.एम.के.बापट, ह्यांचे ते नियमितपणाने पाठवीत असलेल्या वाढदिवसाच्या किंवा जन्मदिवसाच्या शुभेच्छांबद्दल हार्दिक आभार मानणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो आणि ते मानतो.

**- श्रीराम हजरनवीस**

**- सौ.छायाबाई हजरनवीस, नागूपर**

********

## विनोद

*वीज बील भरणा केंद्रावर बील धारकांची भली मोठी रांग होती. एकच खिडकी चालू असल्यामुळे रांग मुंगीच्या गतीने पुढे सरकत होती. अर्धा तास उलटून गेला तरी माझा नंबर बराच दूर होता. आणखी किती वेळ रांगेत तिष्ठत उभे रहावे लागणार या विवंचनेत मी होतो. माझ्या मागे एक वयस्कर बाई उभी होती. तीही रांगेत उभे राहून कंटाळली होती व तिची तशी अवस्था पाहून तिला म्हणालो, ''बाई तुम्ही कशाला त्रास घेतला ? आपला नंबर लागायला अजून कमीत कमी अर्धा-पाऊण तास तरी लागेल. इतक्या वेळ उभ्या आहात. तुम्हाला त्रास होईल उभं रहाण्याचा. मुलाला किंवा सुनेला पाठवायचं बील भरायला. आपण कशाला या वयात त्रास घ्यायचा ?''*

*''अहो, मी कसली सुनेला पाठवतेय ? आमच्या सासूबाईंनीच मला बील भरायला पाठवलं आहे. मग मी काय करणार ?''*

**- प्रभाकर गुपचूप** (पुणे)

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.

Printed Matter

*If Undelivered Please Return to :*

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To

**प्रकाशक :** श्री. रा. ना. लळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
**संपादक मंडळ :** सर्वश्री. वसंत धुपकर, प्रभाकर गुपचुप, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे, क्रांतिसेन आठवले
**मुद्रक :** संविज्ञान इन्फोटेक प्रा. लि., ४९/७६३ लोकमान्य नगर, नवी पेठ, पुणे-३० फोन : २४३३५३०५, २४३३५३२४, ३२५४११५९